MHJN090008742025

नि.दि.दावा क्र.१०४/२०२५
कैलास वि. गोपाल.

## नि.क्र.१३ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्ती करणेकामी तसेच आदेश १ नियम १० अन्वये नव्याने प्रतिवादी क्र. २ यांना पक्षकार म्हणुन समाविष्ट करणेबाबत दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या मते सदरचा दावा त्यांनी प्रतिवादी क्र. १ याच्या विरुद्ध सदर दावा प्रतिकुल ताबा आधारे मालकी घोषीत करुन मिळणे करीता दाखल केला असुन त्या अनुशंगाने प्रतिवादी विरुद्ध शाश्वत मनाई हुकूम मिळण्याची विनंती वादीने केली आहे. दावा प्रलंबीत असतांना प्रतिवादीने बेकायदेशीरपणे गणेश जाधव यांना दावा मिळकत विक्री केली आहे. त्यामुळे गणेश जाधव यांना प्रतिवादी क्र. २ म्हणुन समाविष्ट करणे व खरेदीखत क्र.४३९/२०२६ बाबत दुरुस्ती करण्याकरीता सदर अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी यांना सदर दाव्याची नोटीस काढण्यात आली. परंतु नोटीसची बजावणी झालेली नाही व ते दाव्यात हजर झालेले नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी सदर अर्जात कोणतेही म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे सदर अर्ज प्रतिवादी यांच्या म्हणणया शिवाय गुणवत्तेवर निकाली काढण्यात येत आहे.

४. वादी तर्फे विधीज्ञ श्री.एस.जे.मगरे यांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादपत्र तसेच त्यासोबत दाखल केलेले कागदपत्र व दाव्याचे निशाणी ०६ वरील अर्ज याचे अवलोकन केले असता वादी यांनी दाव्यामध्ये दुरुस्ती करणेकामी सदरचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज आव्हानीत केला नाही. प्रतिवादी यांनी दावा प्रलंबीत असतांना दावा

मिळकतीतील क्षेत्र विक्री केल्याने वादी यांना दावा दुरुस्त करणे भाग पडले आहे. वादी यांची दुरुस्ती ही नामंजुर केल्यास वादी यांना नविन दावा दाखल करणे भाग पडणार आहे. दावा हा सध्या प्राथमीक टप्पयावर असुन दाव्यामध्ये पुरावा चालु झालेला नाही. अशा परिस्थीतीत वादी यांचा दुरुस्तीचा अर्ज मंजुर करणे गरजेचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वादीचा निशाणी ०६ खालील अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने विहीत कालावधीत दाव्यात आवश्यक ती दुरुस्ती व दावा दुरुस्ती प्रत अभिलेखावर दाखल करावी.

स्वा/-

दि.१६.०३.२०२६

(श्री जी.एन. लंघे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
बदनापूर.